Review Of Research ORIGINAL ARTICLE ISSN:- 2249-894X

# रामगडची राणी अवंतीबाईचे 1857 च्या स्वातंत्र्य संग्रामातील योगदान

**सारांश :**

1857 च्या स्वातंत्र्य संग्रामाला भारतीय इतिहासात विशेष असे स्थान आहे. भारतात ब्रिटीशांची सत्ता स्थापन झाल्यानंतर त्या सत्तेचे भारतातून उच्चाटन करण्यासाठी भारतीयांनी केलेला पहिला मोठा प्रयत्न म्हणजे इ.स. 1857 चे स्वातंत्र्य युध्द होय. या स्वातंत्र्य लढयात भारताच्या विविध भागातील, विविध स्तरातील लोकांनी मोठया प्रमाणात भाग घेतला. विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे महिलांनीही अत्यंत धैर्याने या लढयात आपले योगदान दिले. राणी लक्ष्मीबाई, बेगम हसरतमहल, बेगम झीनतमहल या वीरंगनाप्रमाणेच मध्यप्रदेशातील दुर्गम भागातील रामगडची राणी अवंतीबाई हिने ब्रिटीशांविरूध्द लढा दिला.




*गोविंद मा. तिरमनवार*

सहायक प्राध्यापक –इतिहास , स्व.दत्तात्रय पुसदकर कला महाविद्यालय, नांदगाव पेठ ता.जि.अमरावती



### *प्रस्तावना :*

रामगडचा राजा विक्रमजीत यांची पत्नी अवंतीबाई हिने अत्यंत पराक्रमाने ब्रिटीशांविरूध्द लढा पुकारून ब्रिटीशांना जेरीस आणले. शौर्याने लढता लढता राणी ब्रिटीशांच्या तावडीत सापडली अशावेळी राणीने शत्रूच्या हाती सापडून स्वतःची विटंबना करून घेण्यापेक्षा तलवार पोटात खुपसून वीर मरण पत्करले. राणी अवंतीबाईचे कार्य प्रेरणादायी आणि स्फूर्तीदायी असेच आहे. 1857 च्या स्वातंत्र्य संग्रामातील शूर, तेजस्वी युध्दकलानिपूण, स्वातंत्र्यभिमान, कर्तृत्ववान व चारित्र्यसंपन्न महिला म्हणून रामगडची राणी अवंतीबाईची कीर्ती भविष्यकाळात इतिहासाला पसरवीत रहावेच लागेल.

1857 च्या स्वातंत्र्य संग्रामाला भारताच्या इतिहासात अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. भारतात ब्रिटीशांची सत्ता स्थापन झाल्यानंतर त्या सत्तेचे उच्चाटन करण्यासाठी भारतीयांनी केलेले पहिले स्वातंत्र्य युध्द म्हणजे 1857 चा स्वातंत्र्य संग्राम होय.

1857 च्या स्वातंत्र्य युध्दात देशाच्या विविध भागातील, विविध स्तरातील लोकांनी भाग घेतला. या स्वातंत्र्य युध्दातातील आणखी एक विशेष म्हणजे खानदेश, गुजरात, माळवा, मध्यप्रदेश, दक्षिणेतील अहमदनगर व नाशिक हे जिल्हे व हैद्राबाद राज्यातील काही प्रदेश आदि ठिकाणच्या भिल्ल, गोंड, कोळी, मरिया, मक्रानी इत्यादी आदिवासी समाजांची इंग्रजी सत्तेविरूध्द झालेली उठावणी. परंतु त्याहीपेक्षा विशेष उल्लेखनीय बाब आहे ती ही की, या कामात स्त्रियांनीही फार मोठया प्रमाणात भाग घेतला. सैनिकांसाठी भोजन तयार करणे, शत्रुपक्षाकडील खोटया व भ्रामक बातम्या पसरविणे, प्रसंगी हातात शस्त्रे घेउन इंग्रज फौजेशी मुकाबला सुध्दा करणे आदि सर्व कामात महिला प्रचंड संख्येने आणि शत्रुला दहशत बसावी इतक्या निकराने सामील झाल्या होत्या. स्त्रियांनी कित्येक ठिकाणी पुरूषाच्या बरोबरीने पराक्रम गाजविलाच, परंतु त्याचबरोबर शत्रुपक्षाकडील धुरंधर सेनानींनाही अचंबा वाटावा असे अनेक समरचमत्कार सुध्दा त्यांनी करून दाखविले.[1]

सत्तावनच्या स्वातंत्र्य युध्दात कर्तृत्व गाजविलेल्या स्त्रिया म्हणून झाशीची राणी लक्ष्मीबाई, अवधची बेगम हसरत महल व दिल्लीची सम्राट बहादूरशहाची बेगम झीनतमहल यांचीच नावे सामान्यतः घेण्यात येतात. या तीनही वीर रमणींची योग्यता फारच थोर होती यात शंका नाही. परंतु या तीन वीरांगणा व्यतिरिक्त भारताच्या सर्वच भागातील अनेक महिलांनी या स्वातंत्र्ययुध्दात भाग घेतला. कानपूरची कलावंतीण अझीजन, तुळसापूर व रामगड येथील राण्या, अहीराची जमीनदारीन लक्ष्मीबाई, ग्वाल्हेरची बायजाबाई शिंदे, कोल्हापूरची ताईबाई, नागपूरची बाकाबाई भोसले, नरगुंद येथील राजमाता यमुनाबाई आणि राजपत्नी सावित्रीबाई, मोतीबाई, सुंदर, झलकारी, ललिता बक्षी, उदादेवी या वीर महिलांनी स्वातंत्र्य युध्दात गाजविलेला पराक्रम स्फूतिदायी व प्रेरणादायी आहे.[2] या सर्व कर्तृत्ववान वीरांगणाबद्दल फार थोडया प्रमाणात लेखन झाले आहे.

1857 च्या स्वातंत्र्य युध्दात मध्यप्रदेशाचे योगदान अत्यंत महत्वपूर्ण आहे. तात्या टोपे, बख्तअली, राणा बख्तवरसिंह, सआदतखान, भगीरथ सिलावट, रणमतसिंह, फरजनअली, दिवान देसपंत बुंदेला, खाज्यानायक, भीमनायक, दौलतसिंह कछवाह गुरूकसिंह, आदिल मोहम्मदखान, फाजील मोहम्मद खॉ, किशोर सिंह, सदाशिवराव अमीन, शंकरशाह, रघुनाथसिंह मंडलोई, भिलाला, महादेवशास्त्री, धीरसिंह बघेल, दौलतसिंह, वारिम मोहम्मदखान, मोहम्मद अलीखान, उमरावसिंह, बोधन दौसा, इत्यादींची भूमिका उल्लेखनिय होती. मंडला जिल्यातील रामगडची राणी अवंतीबाईने भारताच्या स्वातंत्र्य प्राप्तीसाठी फार मोठे प्रयत्न केले.[3] सत्तावनच्या स्वातंत्र्य संग्रामात सातपुडयाच्या प्रदेशातील एका आदिवासी प्रदेशातील रामगड ची राणी अवंतीबाई ने 1857 मध्ये ब्रिटीश राजवटीविरूध्द लढली ही गोष्ट पुष्कळांना माहित नाही. राणी अवंतीबाईची सत्तावनच्या लढयातील सक्रिय भूमिका आणि त्यांनी गाजविलेल्या पराक्रमाची माहिती सर्वांना व्हावी हीच प्रस्तृत शोध निबंध लेखनामागची भूमिका.

लोधी जातीच्या राणी अवंतीबाईने जेव्हा ब्रिटीश राजवटीविरूध्द बंड पुकारले तेव्हा तिने सभोवतालचे जहागीरदार आणि जमीनदारांचे सहकार्य प्राप्त केले. राणीच्या प्रयत्नामुळे मंडला जिल्हा काही वेळपर्यंत स्वतंत्र झाला. इंग्रजांची सत्ता नष्ट झाली इतकेच नव्हे तर तेथील ब्रिटीश डेप्युटी कमिशनरला जवळच्या जिल्हयात जाउन शरण घ्यावे लागले. अवंतीबाईचा जन्म मध्यप्रदेशाच्या सिवनी जिल्हयातील मनकेडी गावी झाला. तिच्या वडिलाचे नाव जूझारसिंह आणि आईचे नाव कृष्णाबाई होते. तिचा विवाह रामगडच्या राजा विक्रमजीत यांच्याशी झाला. रामगड मध्यप्रदेशातील डिव्होरी जिल्हयात खरमेर नदीच्या काठी असलेले एक लहानसे गाव. खरेतर नदी उत्तरेकडे वाहत जावून नर्मदा नदीला जावून मिळते. त्या प्रदेशात रामगड संस्थान होते. तेथे अधिकतर झलकसंख्या गोंडाची होती. सत्तावनच्या स्वातंत्र्य युध्दाच्या वेळी रामगडचा राजा विक्रमजीत असून त्याच्या पत्नीचे नाव अवंतीबाई होते.[4]

लॉर्ड डलहौसीच्या वेळी रामगडच्या राजा विक्रमजीत होता आणि त्याची पत्नी अवंतीबाई होती. दुर्दैवाने गादीवर बसल्यानंतर अल्पकाळात राजा विक्रमजीतचे मानसिक संतुलन बिघडल्यामुळे राज्याची संपूर्ण व्यवस्था पत्नी अवंतीबाईने सांभाळली. विक्रमजीतची मानसिक स्थिती बिघडली हे कारण दाखवून इंग्रज सरकारने रामगडचे राज्य कार्ट आफ वाईसच्या अंतर्गत केले व राज्याच्या व्यवस्थेकरीता एक मॅनेजर नेमण्यात येउन त्याच्या मदतीकरीता सरकारी कर्मचारी ठेवण्यात आले. ही गोष्ट राणी अवंतीबाईला आवडली नाही. तिने इंग्रजांना विरोध केला. 1857 च्या स्वातंत्र्य युध्दाची ठिणगी पडताच राणी अवंतीबाईने ब्रिटीशा विरूध्द बंडाचा झेंडा फडकाविला.[5]

मंडला जिल्हयात रामगडच्या राणीच्या नेतृत्वाखाली बंडाला सुरूवात होण्यापूर्वी जबलपूर आणि सागर येथे बंडाच्या घटना घडल्या त्याचाच प्रभाव मंडलावर पडला. शहपूराचा लोधी ठाकूर विनयसिंह, सोहगपूरचा बघेल ठाकूर, गुरूलसिंह आणि रामगडची राणी अवंतीबाई हे तिघे मंडला जिल्हयातील उठावाचे प्रमुख आधारस्तंभ होते.[6] शहापूर, सोहगपूर, आणि रामगड येथे ब्रिटीशांविरूध्द उठावाला सुरूवात झाली. रामगड येथे ब्रिटीशांविरूध्द जे काही घडले त्यात राणी अवंतीबाईची भूमिका महत्वपूर्ण होती. कारण रामगडचा कारभार दिवाणाच्या मदतीने राणी अवंतीबाई सांभाळत होती. मंडला जिल्हयातही राणीची भूमिका महत्वपूर्ण होती.[7]

26 सप्टेंबर 1857 रोजी रामगड येथे थांबलेल्या सरकारी कर्मचा–यांना रामगड सोडण्याकरीता बाध्य व्हावे लागले आणि खजिन्यावर रामगडच्या राजाचा अधिकार करण्यात आला. या लोकांचा पुढारी राणीचा भाउ सीताराम, राजाचा दिवाण सुकई आणि त्याचा मुलगा हिरालाल होते. यानंतर मंडला जिल्हयात उठाववाल्यांनी ब्रिटीशांविरूध्द ज्या काही घडामोंडी घडवून आणल्या त्यात राणी अवंतीबाईची भूमिका महत्वपूर्ण होती. मंडला जिल्हयाचा तत्कालीन डेप्युटी कमिश्नर कॅप्टन एच.फ.वाडिगटंन उठावाल्यांच्या कारणांमुळे जेरीस आला.

1 एप्रिल 1858 रोजी वाडिगटंनच्या सैन्य तुकडीने रामगडकडे कूच केले. ब्रिटीशांची सेना येताच राणी अवंतीबाई प्रतिकाराचा पवित्रा घेवून उभी राहिली. काही काळपर्यंत राणीने शर्थीने रामगड लढविले. पण इंग्रजांच्या गोळीबारापुढे आपल्या जुजबी तटबंदीचा फारसा निभाव लागणार नाही हे तिला लवकरच कळून चुकले. रामगडात राहूनच अधिक काळ युध्द चालविल्यास तिच्या प्रजेचीच अधिक हानी होणार होती म्हणून इंग्रजी फौजेस हुलकावनी देउन राणी रामगडच्या बाहेर पडली.[8]

त्यानंतर इंग्रजी फौजेने रामगडच्या राजाच्या वाडयावर अधिकार केला.[9] रामगडच्या बाहेर पडलेली राणी अवंतीबाई दुर्गम अशा अरण्यात शिरली. मंडला जिल्हयातील हे अरण्य फार घनदाट होते. अशा दुर्गम अरण्यात राणीचा पाठलाग करणे वाडिगटंनला अशक्य वाटले त्यामुळे त्याने रामगडलाच आपला तळ ठोकला. परंतु राणी अवंतीबाई त्यास स्वस्थ बसू देत नव्हती. गनिमी पध्दतीने इंग्रज फौजेवर हल्ले करून राणीने वाडिंगटनला जेरीस आणले.त्याच्या फौजेचे नुकसानही खूप झाले. राणीच्या हल्ल्यांनी मेटाकुळीस आलेल्या वाश्गिटंनने राणीला धेरून जिवंत धरण्याची योजना आखली. या योजनेची कल्पना राणीला आली नाही. राणीने आपल्या पूर्वीच्याच पध्दतीने इंग्रज फौजेवर हल्ला चढविला असतांना ती घेरली गेली[10] आता आपण शत्रूच्या हाती सापडणार हे राणीला स्पष्ट दिसू लागले. शत्रुच्या हाती सापडून स्वतःची विटंबना करून घेण्यापेक्षा राणीने लगेच आपल्या सेवकाकडून तलवार हिसकली आणि स्वतःच्या शरीरात खुपसली. जेव्हा ब्रिटीश राणीजवळ पोहोचले तेव्हा ती आसन्न मृत्यूच्या वाटेवर होती.[11] 20 मार्च 1858 रोजी राणी अवंतीबाई वीरगतीस प्राप्त झाली.[12] आपले वीर पूर्वज राणी दुर्गावतीप्रमाणे शेवटपर्यत स्वातंत्र्याचे रक्षण करीत राणी अवंतीबाईने शौर्याने रणांगणात वीर मरण पत्करले.

सत्तावनच्या स्वातंत्र्य संग्रामातील शूर, तेजस्वी, युध्दकलानिपूण, स्वातंत्र्यभिमानी, कर्तृत्ववान व चारित्र्यसंपन्न महिला म्हणून रामगडची राणी अवंतीबाईची कीर्ती भविष्यकाळात इतिहासाला पसरवीत रहावेच लागेल.

## संदर्भ


1.हरिहर वा. देशपांडे, 1857 च्या वीर महिला, कृष्ण हरिहर देशपांडे, नागपूर, द्वितीय आवृत्ती, 2014, पृ. 15.
2.कित्ता पृ. 13.
3.अंधारे भा. रा., 1857 च्या स्वातंत्र्य समरातील वीरांगणा व निवडक क्रांतिकारक, विश्वभारती प्रकाशन, 2008, पृ. 59.
4.Lodhirameshvermadongargarh.wordpress.com
5.भा. रा. अंधारे, उपरोक्त, पृ. 60.
6.कित्ता पृ. 62.
7.कित्ता पृ. 63.
8.हरिहर वा. देशपांडे, उपरोक्त, पृ. 92.
9.भा. रा. अंधारे, उपरोक्त, पृ. 68.
10.हरिहर वा. देशपांडे, उपरोक्त, पृ. 93.
11.Dvarka Prasad Mishra (Ed) The history of freedom movement in Madhya Pradesh, Page No. 81.
12.Bernard A. Cook, Women and War, A Historical Encyclopedia from Antiquity to the present, Page No. 199.